**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम - सुमन नगर, पोस्ट - बोधेगाव, तालुका- शेवगाव, जिल्हा - अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित ३०.० किलो लिटर / प्रति दिन क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम - सुमन नगर, पोस्ट - बोधेगाव, तालुका- शेवगाव, जिल्हा - अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित ३०.० किलो लिटर/प्रति दिन क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक, १० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५९/२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २०१०२३-FTS-००९४ दिनांक २३/१०/२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी -अहमदनगर<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहमदनगर | - | **संयोजक** |

श्री. संजीव रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर तथा सदस्य, संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर, प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

सदस्य, संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी समितीच्या अध्यक्षांचे, सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, संयोजक, यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री संजीव रेदासनी यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम - सुमन नगर, पोस्ट - बोधेगाव, तालुका- शेवगाव, जिल्हा - अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित ३०.० किलो लिटर/प्रति दिन क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ब ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

सदस्य, संयोजक, यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील राज्य पर्यावरण तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०१-०९-२०१९ रोजी सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक १०-१०-२०१९ रोजी प्रदान केली.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी

बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळण, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत दिनांक ३०-०९-२०२० व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू. सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-अहमदनगर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, अहमदनगर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर , तहसील कार्यालय-शेवगाव, जिल्हा - अहमदनगर, ग्रामपंचायत कार्यालय- बोधेगाव, हातगाव, बाडगव्हाण, लाडजळगाव, शिंगोरी गाव, दिवटे, चेडे-चांदगाव,मंगरुळ खुर्द, तालुका - शेवगाव, जिल्हा - अहमदनगर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

सदस्य, संयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर यांना एकही सूचना /तक्रार नोंदविण्यात आलेली नाही. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, संयोजक श्री रेदासनी यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित नविन आसवणी प्रकल्पास ५३.५० कोटी रुपयांचा खर्च येणार असून प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) आहे. त्यांनी विविध प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती दिली.

सादरीकरणानंतर सदस्य, संयोजक,, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना काही स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. ती खालीलप्रमाणेः- सादरीकरण पूर्ण झाल्यावर सदस्य, संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना विचारले की -

अ) ईटीपीचा डायग्रॅम/फ्लो चार्ट पहावे. त्यात २६८ घनमीटर प्रति दिनवरुन फ्लो २८३ घनमीटर प्रतिदिन दाखविले आहे. कधी २६८ तर कधी २८३? त्यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी २८३ घनमीटर प्रति दिन वाढल्याचे कारण आर.ओ.रिजेक्ट जे सीपीयुकडून येते त्यामुळे वाढलेले आहे. त्यावेळी सदस्य, संयोजक यांनी चार्टवरुन ते कळत नाही, वेगळे दाखविण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले. त्यावर प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी आर.ओ.रिजेक्ट हे - सीपीयुकडून येते असे सांगितले.

ब) सदस्य, संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना कंपोस्ट यार्डविषयी माहिती विचारली. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार कंपोस्ट यार्ड तयार करण्यात येईल. तीन एकरात वीटा किंवा आरसीसीव्दारे करण्यात येईल.

क) सदस्य, संयोजक यांनी विचारणा केली की जर स्पेंट वॉश ३२८ वरुन ६५ वर येत असेल, तर किती टक्के कपात होईल? त्याप्रमाणे आपल्याला प्रकल्पाचे आरेखन (design) करावे लागेल. श्री रेदासनी यांनी सांगितले की व्हॉल्युम रिडक्शन ३०% होत नाही. त्यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी ३०% कॉन्सन्ट्रेशन रिडक्शन कसे होते याबाबत सविस्तर विवेचन केले.

ड) सदस्य, संयोजक यांनी ऑनलाईन मॉनिटरिंगबाबत काहीही उल्लेख नाही. त्यात काय काय बसविणार याची माहिती विचारली. पॉवर जनरेशन बाबत स्पष्टीकरण विचारण्यात आले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी ऑनलाईन मॉनिटरिंग तसेच वीज निर्मितीबाबत सविस्तर माहिती सांगितली.

श्री संजीव रेदासनी, सदस्य, संयोजक यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी अतिशय चांगल्या प्रकारे सादरीकरण केलेले आहे. पर्यावरणाच्यादृष्टीने सर्व मुद्दे स्पष्टपणे सादर केलेले आहेत, उपाययोजनाही सांगितलेल्या आहेत. तरी परिसरातील

नागरिक जे उपस्थित आहेत, त्यांनी सदरहू प्रकल्पाबाबतच पर्यावरणाचे मुद्दे उपस्थित करण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मेसर्स श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सुमननगर, पोस्ट-बोधेगाव, तालुका-शेवगाव, जिल्हा-अहमदनगर यांच्या मोलॅसिसि/उसाच्या रसावर चालणारा ३०.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणीच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी आपण येथे जमलेलो आहोत. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेनुसार यातील एक जनसुनावणी हा एक टप्पा आहे. तर येथे उपस्थित पंचक्रोशीतील नागरिकांना या प्रकल्पाच्या उभारणीमुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी काही सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असेल तर ते मांडण्यासाठीच ही जनसुनावणी आहे. जनसुनावणीसाठी अधिसूचनेनुसार व्यापक प्रसिध्दि देण्यात आलेली आहे. गेले २५-३० वर्षे हा प्रकल्प ह्या भागातील विकासाचे केंद्र राहिलेले आहे. बेरोजगारी, हाताला काम नाही अशी स्थिती असताना महाराष्ट्रात असे बरेच सहकारी साखर कारखाने आहेत की त्यांनी ग्रामीण भागात विकासाचे रुप घेऊन पुढे आलेले आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी अतिशय उत्कृष्टपणे सादरीकरण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केलेले आहे. त्यांनी प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी मांडल्या आहेत. १००% मळी तसेच उसाचा सिरप वापरण्याचा त्यांचा मानस आहे. तरी उपस्थितांना ज्यांना काही सूचना, आक्षेप नोंदवायचे असतील, त्यांनी ते उपस्थित करावे. आपले नाव व गाव याची माहिती देऊन प्रश्न विचारावेत. ज्यांना लेखी निवेदन द्यायचे आहे, त्यांनी ते मांडावेत. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की याची व्हिडियो शुटींग चालू असून बैठकीच्या इतिवृतात याचा समावेश करण्यात येईल.

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

१) **श्री कारभारी गावडे, गाव-चेडे-चांदगाव, तालुका-शेवगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

मी शेतकरी असून या कारखान्याचा सभासद आहे. या प्रकल्पामुळे सभासदांना काय फायदा होईल?

प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की मळीचे रुपांतर हे अल्कोहोलमध्ये केल्याने त्या मुल्यवर्धनात वाढ होईल. आपला १००% मळी वापरण्याचा मानस आहे. त्यामुळे

कारखान्याच्या उत्पन्नात वाढ होऊन शेतक-यांच्या ऊसाला १५०-२०० प्रति टन जादा भाव देता येईल.

त्याचप्रमाणे नविन आसवणी प्रकल्पामुळे रोजगाराची संधिही स्थानिकांना मिळणार आहे. प्रकल्पात उत्पन्न् होणारे प्रेस मड व सांडपाणी यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यात जीवाणुंची वाढ केल्यानंतर जे सेंद्रीय खत तयार होईल, त्यात मायक्रो न्युट्रीयंटस् टाकले, तर जो शेतकरी हे खत वापरेल, तर त्याच्या पीकात १०-१५% वाढ होऊ शकते.

हा सभासदांचा कारखाना आहे. साखर कारखान्यात साखरेचे साठे पडून राहतात. बँकेला व्याज तर द्यावेच लागते. सभासदांना एफआरपी ही कमी द्यावी लागते. तरी आसवणी प्रकल्पामुळे जे लाभ वाढतील, त्यामुळे टप्याटप्याने आपल्याला पुढील काही प्रकल्प हाती घेता येतील. आपल्या भागात तुर खूप येते. १५,००० सभासद एकत्र आल्याने आपण दालमील टाकू शकतो. आपली इक्व्हीटी तयार होईल व असे अनेक प्रकल्प आपण सुरु करु शकतो. पुढील दहा वर्षांचे नियोजन करण्यात आलेले आहे. आपल्या सहकार्याने पुढील प्रकल्प आपण यशस्वी करु शकतो.

२) **<u>श्री आयुब जयबुद्दीन शेख, राहणार-बोधेगाव, तालुका-शेवगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

मी कारखान्याचा सभासद असून शेतकरी आहे. या प्रकल्पाचा शेतक-याला प्रत्यक्ष आर्थिक फायदा होईल काय?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा करण्यात आली की ऊसाच्या भावात काही फायदा होईल काय? प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की ऊसाला निश्चितच समाधानकारक भाव देता येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की कारखाना आर्थिकदृट्या सक्षम होणार आहे, मात्र ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असल्याने आपले पर्यावरणविषयक प्रश्न असावेत. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर काही दुष्परिणाम होईल का असे आपणास वाटत असल्यास त्याप्रमाणे आक्षेप नोंदवावेत.

३) **<u>श्री बाळासाहेब शेषराव काजळे, बाडगव्हाण, तालुका - शेवगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

मी शेतकरी असून कारखान्याचा सभासदसुध्दा आहे. या प्रकल्पात उत्पन्न होणा-या पाणी प्रदूषणाबाबत काय उपाययोजना करण्यात येणार आहेत?

प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रदूषण कोणतेही असो, जलप्रदूषण असो किंवा हवा प्रदूषण असो, त्याबाबत परिपूर्ण आराखडा तयार करण्यात आलेला आहे. प्रकल्पात सांडपाण्याची निर्मिती होईल. त्यास आपण स्पेंट वॉश असे म्हणतो. त्यात बीओडी

मोठ्या प्रमाणात असतो. भारत सरकारच्या धोरणानुसार त्या स्पेंट वॉशपासून आपण बायोगॅस निर्माण करु शकतो. तो आपण येथे निश्चितच करणार आहोत. हे बायोगॅस इंधन आहे. ते इतर घन इंधनापेक्षा (उदा. कोळश्यापेक्षा) चांगल्या प्रकारचे इंधन आहे. त्याच्या वापराने बॉयलरची क्षमता जास्त मिळते. इंधनाची बचत होणार आहे. त्यावर प्रक्रिया झाल्यावर बाहेर येणारा जो रेसिड्यु आहे, त्यामुळे प्रदूषणाची तीव्रता कमी होते. त्याचे बीओडीचे प्रमाण ८५-९०% असेल, जर चांगल्याप्रकारे बायोगॅस प्लँट चालवला तर उरलेल्या स्पेंट वॉशमधील न्युट्रियंट हे चांगल्या प्रकारचे असतात. ब्राझील सारख्या देशात व इतरही काही देशात त्याचा वापर हा कंट्रोल लँडपध्दतीने केल्यास जमिनाला खूप छान अनेक प्रकारची न्युट्रीयंट्स मिळतात. पण फवारणी योग्य प्रकारे केले नाही, पावसाच्या दरम्यान केली, तर भूगर्भात प्रदूषण होऊ शकते. त्याचे विपरित परिणाम टाळण्याकरिता आपण त्याचे गतीकरण (Concentration) करणार आहोत. म्हणजे ३२८ टन प्रतिदिन आपण ६५ टन प्रतिदिन करणार आहोत. नंतर प्रेसमड व याचे मिश्रण करुन त्यावर कल्चर टाकून चांगले सेंद्रीय खत तयार करता येईल. त्यात नायट्रोजन कन्टेन्स १.५ ते २.०% या दरम्यान असेल. त्यास आपण P2O5 अथवा फॉस्फरस असे म्हणतो. त्याचे प्रमाण १.५ ते १.८% राहिल व K2O ज्यास आपण पोटॅश म्हणतो, त्याचे प्रमाण ३.० ते ३.५ % असेल. शिवाय इतर न्युट्रियन्ट्स आहेत. अशा प्रकारे सांडपाण्याची प्रत्येक टप्प्यात आपण चांगल्या कामासाठी उपयोग करुन घेणार आहोत. शिवाय हा प्रकल्प पूर्णपणे झिरो लिक्विड डिस्चार्ज असणार आहे. प्रकल्पातील सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. आपण प्रदूषणावर मात करणार आहोत. इव्हॅपोरोशन युनिटमधून येणारी वाफ, कन्डेन्सेट तसेच कुलिंग टॉवरकडून व इतर ठिकाणावरुन येणारे दुषित पाण्यावर प्रकियेसाठी सीपीयु (कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट) युनिटचा वापर करण्यात येणार असून त्यामुळे ८०% पाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे.

जेणेकरुन पाण्याची गरजसुध्दा भागणार असून शुध्द पाण्याची गरज आपली कमी करण्यात येईल. पाण्यासाठी लागणारा कर (सेस) आपल्याला कमी द्यावा लागेल.

४) **<u>श्री प्रमोद विठ्ठल अभंग, राहणार-हातगाव, तालुका - शेवगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

मी शेतकरी असून कारखान्याचा सभासद आहे. या आसवणी प्रकल्पामुळे आसपासच्या परिसरास काय फायदा होणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की याचे उत्तर पूर्वी देण्यात आलेले आहे. आसवणी प्रकल्पामुळे प्रकल्प प्रवर्तकांना फायदा होऊन ऊसास जास्त भाव देता येईल, स्थानिकांना रोजगाराची संधि मिळणार आहे, सामाजिक बांधिलकीच्या

तत्वाप्रमाणे परिसरात विविध सामाजिक उपक्रमांना आर्थिक मदत करता येईल. त्यांनी सांगितले की आपण सभासद असल्याने जर आपण ऊस कारखाना चांगला चालविला, तर पुढे आसवणी प्रकल्पाची क्षमता वाढविता येईल, इतर अनेक प्रकल्प हाती घेता येतील. तरी सर्वांनी या प्रकल्पास पाठिंबा द्यावा.

५) **श्री विजय कानडे, बोधेगाव, तालुका-शेवगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

या प्रकल्पातील पाणी जवळील स्थानिक शेतक-यांना शेतीसाठी मिळेल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आपल्या परिसरात सरासरी ५१० मिली मीटर प्रतिवर्षी पाऊस पडतो. त्याचप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासाठी सर्वेक्षण व अभ्यास करताना असे निदर्शनास आले की आपल्या भागात अनेक बंधारे आहेत. तर आपण एकत्र येऊन पावसाचे पाणी साठवणीसाठी प्रयत्न् करणे हा एक भाग आहे. त्याचप्रमाणे भूगर्भातील पाण्याची पातळी कशी वाढविता येईल हा विचार आपणास करायचा आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी विचार केलेला आहे की कारखान्याचे जे पाणी बाहेरून घ्यावे लागते, ते शून्य कसे करता येईल यासाठी प्रयत्न करणे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना आपण कारखान्याच्या माध्यमातून राबविणे शक्य आहे. परिसरातील इतर पीकांसाठी पाण्याची उपलब्धता करणे शक्य आहे.

यावेळी सदस्य, संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार आसवणी प्रकल्प हा शून्य द्रव निःसारण म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असतो. त्यामुळे कोणीही असा विचार करु नये की कारखान्याचे सांडपाणी शेतक-यांना मिळेल. ते कदापिही होणार नाही. कारण केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांना आसवणी प्रकल्प शून्य द्रव निःसारण म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्जच प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे.

सदस्य, संयोजक यांनी पुढे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितल्याप्रमाणे सीएसआर निधिअंतर्गत पाणी अडवा, पाणी जिरवा किंवा शेततळी उभारणे अशा महाराष्ट्र शासनाच्या योजना कारखाना सहकार्याने राबवू शकतो. सांडपाणी हे शेतक-यांना कधिही मिळू शकत नाही हे सर्वांनी लक्षात ठेवावे.

सदस्य, संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून कोणताच

प्रतिसाद नव्हता. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. सदरहू प्रकल्प हा लाल (Red) संवर्गात मोडत आहे व चर्चा झाल्याप्रमाणे आसवणी प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून त्या अटींवर सदरहू प्रकल्पास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याबाबत कारखाना काळजी घेईल. बैठकीचे इतिवृत्त तयार करुन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(संजीव रेदासनी)**
सदस्य, संयोजक,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर

**(संदीप निचित)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर,